वर्ष-०८ | अंक-१३ | मुंबई, मंगळवार १५ ते २१ फेब्रुवारी २०२२ | पृष्ठ-४
ठाणे आवृत्ती
मराठी साप्ताहिक
R.N.I. No. MAHMAR/2014/60133
मूल्य २/- रुपये
POSTAL REGISTRATION
No.PLG/205/2022-2024

# पोलीस बातमी पत्र

पोलीस बातमी पत्र
●संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

PG 2 ओमिक्रॉन या विषाणूचा सामना करण्यासाठी महापालिका सज्ज

3 → लिफ्ट देण्याचा बहाणा, निर्जनस्थळी नेत महिलांची लूट, पुण्यातील भामटा अखेर जेरबंद
व्हिस्की खरेदीच्या नादात दादरमधील 74 वर्षीय अभिनेत्रीची फसवणूक, 3 लाखांचा ऑनलाईन गंडा ← 4

www.policebatmipatra.com / policebatmipatra.in policebatmipatra@gmail.com FOLLOW US! https://policebatmipatra.page

## रिक्षा चालकाची गोळ्या झाडून हत्या, मुंबईतील धारावीत थरार



मुंबई : गोळीबारात जखमी झालेल्या रिक्षा चालकाचा (Auto Rickhaw Driver Murder) उपचारादरम्यान मृत्यू झाला. मुंबईत हा धक्कादायक प्रकार (Mumbai Crime News) घडल्याचं उघडकीस आलं आहे. धारावी येथे दोन अज्ञात व्यक्तींनी त्याच्यावर गोळ्या झाडल्या (Dharavi Firing) होत्या. यामध्ये 30 वर्षीय रिक्षा चालक आमिर अनिस खान जखमी झाला होता. रविवारी सकाळी त्याची प्राणज्योत मालवली. सायन रुग्णालयात उपचार सुरु असताना त्याने अखेरचा श्वास घेतला. शनिवारी धारावीत आमिरवर चार राऊंड गोळीबार करणाऱ्या दोन संशयितांचा शोध धारावी पोलीस आणि शहर गुन्हे शाखा घेत आहेत. दोन गटांमधील वादातून रिक्षा चालकाची हत्या झाल्याचा पोलिसांना संशय आहे.

काय आहे प्रकरण?

गोळीबारात जखमी झालेल्या रिक्षा चालकाचा रुग्णालयात उपचार सुरु असताना मृत्यू झाला. मुंबईतील धारावी परिसरात मिठी नदीजवळ असलेल्या पिवळा बंगला भागात शनिवारी ही घटना घडल्याचं उघडकीस आलं आहे.

उपचारादरम्यान मृत्यू

दोन अज्ञात व्यक्तींनी त्याच्यावर गोळ्या झाडल्या होत्या. त्याच्यावर नजीकच्या सायन रुग्णालयात उपचार सुरु होते. मात्र उपचार सुरु असताना दुसऱ्याच दिवशी म्हणजे रविवारी सकाळी त्याचे निधन झाले.

महिलेची चौकशी सुरु

पोलिसांनी सांगितले की, त्याच्या छातीवर आणि पाठीवर दोन गोळ्या लागल्या होत्या, तर इतर दोन गोळ्या त्याच्या हाताला लागल्या होत्या. गोळीबार प्रकरणी आम्ही एका महिलेची चौकशी करत आहोत. आमची टीम आमिर अनिस खानवर गोळीबार करणाऱ्या दोघा जणांना पकडण्याचा प्रयत्न करत आहे. अद्याप कोणालाही अटक करण्यात आलेली नाही, असे एका पोलीस अधिकाऱ्याने सांगितले.

## मुंबई विमानतळावर 60 कोटींचे ड्रग्ज हस्तगत, झिम्बाब्वेहून आलेली महिला अटक



मुंबई : झिम्बाब्वेहून मुंबईत आलेल्या एका महिलेकडून कस्टम विभागाने मुंबई विमानतळावर (Mumbai Airport) 6 किलो हेरॉईन आणि 1.480 ग्राम एमडी ड्रग्ज हस्तगत (Drugs seized) केले आहे. एअर इंटेलिजन्स युनिट (AIU)ने 12 फेब्रुवारी रोजी ही कारवाई केली आहे. विमानतळावर आरोपी महिलेच्या सामानाची तपासणी करताना हे ड्रग्ज सापडले. महिलेने हे ड्रग्ज आपल्या ट्रॉली बॅग आणि फाईल फोल्डरमध्ये लपवले होते. जप्त करण्यात आलेल्या ड्रग्जची आंतरराष्ट्रीय बाजारात किंमत 60 कोटी रुपये आहे. याप्रकरणी महिलेला अटक करण्यात आली असून पुढील कारवाई सुरु आहे.

या कारवाईबद्दल बोलताना कस्टम अधिकाऱ्याने सांगितले की, "अमली पदार्थांच्या तस्करांविरुद्धची आमची मोहीम सुरू ठेवत, कस्टमच्या एआययू अधिकाऱ्यांनी शनिवारी हरारेहून आलेल्या एका झिम्बाब्वेच्या महिला प्रवाशाला रोखले. ती 7006 ग्रॅम पिवळी पावडर "हेरॉईन" आणि 1480 ग्रॅम "हेरॉईन" आणि "मेथॅम्प" चे मिश्रण व्हाईट क्रिस्टल ग्रॅन्युल आढळले, अशी माहिती कस्टमच्या एका अधिकाऱ्याने दिली. कस्टम्स अधिकारी महिलेकडून ड्रग्ज पुरवठादार आणि ग्राहकाची चौकशी करत आहेत.

## विनयभंगाच्या गुन्ह्यात टीव्ही अभिनेता अटकेत



कोल्हापूर: छोट्या पडद्यावरील एका कलाकारास राजारामपुरी पोलिसांनी विनयभंगाच्या गुन्ह्यामध्ये अटक केली आहे. जितेंद्र शेलाजी पोळ (वय ३२, रा. कात्यायनी कॉम्प्लेक्स, कळंबा, कोल्हापुर) असे अटक केलेल्या कलाकाराचे नाव आहे.

'गजानन महाराज शेगाव' या मालिकेत पोळ याने भूमिका केली आहे, अशी माहिती त्यांने पोलिसांना दिली आहे.

## शासकीय तांदळाची अवैध वाहतूक पकडली



अवैधरीत्या शासकीय तांदळाची वाहतूक करणाऱ्या तीन ट्रकवर गुन्हे शाखेच्या युनिट दोनने हडपसर येथे कारवाई केली. या ट्रकमध्ये तब्बल ९७ लाख ४४ हजार रुपयांचा ८०० क्विंटल तांदूळ जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी हडपसर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करून सहा जणांना अटक करण्यात आली आहे.

महंमद इरफान मेहमुदल हसन अन्सारी (वय ३२), इरफान शेरू शेख (वय २८), महंमद आसिफ अब्दुल लतीफ अन्सारी (वय ३०), शेख जावेद रफीम (वय ४४), महंमद इब्राहिम अब्दुल जब्बार (वय ५५), मुस्तकीन इस्माइल शहा (वय २३, सर्वजण रा. धुळे) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. गुन्हे शाखेच्या युनिट दोनकडून स्वारगेट हद्दीत पेट्रोलिंग करत फिरत असताना त्यांना तांदळाची अवैध वाहतूक होत असून, ते ट्रक हडपसर येथील १५ नंबर येथे येणार असल्याची माहिती मिळाली.

## तोरणा गडावर अपघातांची मालिका सुरुच; डोक्यात दगड पडून तरुणाचा मृत्यू



वेल्हे तालुक्यातील तोरणा गडावर चढाई करीत असताना दगड डोक्यात पडून पुण्यातील तरुणाचा मृत्यू झाला. ही घटना रविवारी सकाळी दहाच्या सुमारास घडली. शनिवारी किल्ला चढताना तरुण इंजिनीअरचा मृत्यू झाल्याच्या घटनेला चोवीस तास उलटत नाहीत तोच आणखी एका तरुणाला जीव गमवावा लागल्याने हळहळ व्यक्त होत आहे. ओमप्रकाश महेशकुमार भरमगुंडे (वय २१, रा. चिंतामणी सोसायटी, कसबा पेठ) असे मृत्यू झालेल्या तरुणाचे नाव आहे. ओमप्रकाश मूळचा कऱ्हाड येथील असून, पुण्यात ॲनिमेशनचा कोर्स करीत होता.

वेल्हे पोलिस ठाण्याचे हवालदार बापू बांदल यांनी सांगितले की,'ओमप्रकाश आणि त्याचे सहा मित्र रविवारी सकाळी साडेआठ वाजता दुचाकीवरून वेल्ह्यात आले. गडाच्या पायथ्याशी दुचाकी लावून ते पाऊलवाटेने निघाले. त्यानंतर काही वेळातच कड्यावरून मोठा दगड कोसळला. ते पाहून अन्य पर्यटकांनी आरडाओरड करण्यास सुरुवात केली. मात्र, कोसळणारा दगड ओमप्रकाशला चुकवता आला नाही. त्यामुळे दगड त्याच्या डोक्यात आदळला. डोक्याच्या उजव्या बाजूला मोठी जखम होऊन रक्तस्राव सुरू झाला. पर्यटकांनी ओमप्रकाशला जखमी अवस्थेतच खाली आणण्यास सुरुवात केली. त्याच्या मित्रांनी '१०८' क्रमांकाला फोन केला.

## धारावीत अज्ञातांकडून गोळीबार, हल्ल्यात तरुण गंभीर जखमी, आरोपींचा शोध सुरु



मुंबई : आशिया खंडातील सर्वांत मोठी झोपडपट्टी असलेल्या धारावी (Dharavi) मधील पिवळा बंगलाच्या बाजूला गावदेवी मंदिराजवळ सकाळी 11 वाजण्याच्या सुमारास दोन अज्ञात हल्लेखोरांनी एका तरुणावर गोळीबार (Firing) केल्याची घटना घडली आहे. या घटनेत तरुण गंभीर जखमी झाला असून त्याच्यार सायन येथील लोकमान्य टिळक रुग्णालयात उपचार सुरु आहेत. मोहम्मद आरिफ उर्फ भैया (35) असे हल्ला करण्यात आलेल्या तरुणाचे नाव आहे. मोहम्मदवर 4 राउंड गोळीबार करण्यात आला. यापैकी मोहम्मदला तीन गोळ्या लागल्या. या हल्ल्यात मोहम्मद आरिफ उर्फ भैय्या गंभीर जखमी झाला. याप्रकरणी धारावी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गोळीबारात तरुण गंभीर जखमी

पोलिसांनी दिलेल्या माहितीप्रमाणे मोहम्मद आरिफ उर्फ भैय्या हा शनिवारी सकाळी पिवळा बंगलाजवळ आला असता त्याच्यावर 2 अज्ञात व्यक्तींनी समोरून गोळीबार केला. गोळीबारात मोहम्मद आरिफवर 4 गोळ्या झाडण्यात आल्या. त्यापैकी 3 गोळ्या मोहम्मद आरिफला लागल्या. त्यामध्ये चेहऱ्यावर, छाती आणि पाठीला प्रत्येकी एकेक गोळी लागली असून यामध्ये आरिफ गंभीर जखमी झाला. त्याच्यावर सायन रुग्णालयात उपचार सुरू आहेत. सध्या त्याची प्रकृती स्थिर असून त्याला लागलेल्या गोळ्या ऑपरेशन दरम्यान काढून टाकण्यात आल्याचे धारावी पोलिस स्टेशनचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक बळवंत पाटील यांनी दिली.

संशयित आरोपींचा पोलिसांकडून शोध सुरु

मोहम्मद हा टेम्पो चालक होता आणि त्याच्या नावावर गुन्हा देखील आहे. तर परवेज बुटा आणि सलीम लंगडा यांनी गोळीबार केल्याचा संशय पोलिसांना असून ह्या दोघांचा शोध सुरू आहे. या गुन्ह्याच्या तपासाकरीता गुन्हे शाखा, स्थानिक पोलीस आणि काही पथके बनवण्यात आली असून आरोपींचा शोध सुरु आहे.

## पत्नीच्या बाळंतपणासाठी सासूला घरी आणले पण घडले भलतेच!



लातूरः लेकीच्या बाळंतपणासाठी जावयाच्या घरी आलेल्या महिलेनं गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. अंतेश्वरी सूर्यकांत चिगळे असं आत्महत्या करणाऱ्या ४५ वर्षीय सासुचं नाव आहे. ही घटना उघडकीस येताच परिसरात खळबळ उडाली आहे.

अहमदपूर तालुक्यातील हाळणी येथील रहिवासी असलेल्या अंतेश्वरी यांची मुलगी लातूरमधील रामनगर परिसरात राहते. तिच्या प्रसूतीसाठी काही दिवसांपूर्वी अंतेश्वरी जावयाच्या घरी आल्या होत्या. गेल्या एक महिन्यांपासून त्या येथेच राहत होत्या. मात्र सकाळी त्यांनी लेक राहत असलेल्या इमारतीच्यावर असणाऱ्या पाण्याच्या टाकीच्या बाजूने सुरक्षेसाठी असणाऱ्या असणाऱ्या लोखंडी पाईपला गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना उघडकीस येताच शिवाजी नगर पोलिसांना कळविण्यात आले. पोलीस घटनास्थळी तात्काळ दाखल झाले. मृतदेह शवविच्छेदनासाठी विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात पाठविण्यात आला. अंतेश्वरी यांच्या आत्महत्येचं कारण अद्याप समजू शकले नाही. या प्रकरणी शिवाजी नगर पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला असून पोलिस पुढील तापस करत आहेत.

## अपघात रोखण्यासाठी पोलिसांची विशेष पथके



शहरातील वाढत्या अपघातांवर नियंत्रण मिळविण्यासाठी पोलिस आयुक्त अमितेशकुमार यांनी विशेष लक्ष केंद्रित केले आहे. अपघात रोखण्यासाठी पोलिसांचे विशेष पथक स्थापन करण्यात आले असून, सोमवारपासून हे पथक कारवाईला सुरुवात करतील.

गेल्यावर्षी शहरात झालेल्या अपघातांमध्ये २७० जणांचा मृत्यू झाला. यापैकी सर्वाधिक अपघात शहरालगतच्या सीमेवर झाले. या ठिकाणी ट्रकमुळे १४० जणांचा मृत्यू झाला. शहरातील १२ पोलिस स्टेशनअंतर्गत हे अपघात घडल्याचे समोर आले. त्यामुळे या ठाण्यांतील अपघातग्रस्त स्थळांचा अभ्यास करण्यात आला. अपघात रोखण्यासाठी संबंधित पोलिस उपायुक्तांच्या नेतृत्वात स्थानिक पोलिस व वाहतूक पोलिसांचा समावेश असलेले 'अपघात प्रतिबंधक पथक' स्थापन करण्यात आले.

हिंगणा, वाडी, एमआयडीसी, गिट्टीखदान, मानकापूर, वाठोडा, बेलतरोडी, हुडकेश्वर, नवीन कामठी, यशोधरानगर, जरीपटका आणि कळमना या पोलिस ठाण्यांचा यात समावेश आहे.

या पोलिस स्टेशनअंतर्गत सुमारे ९० ब्लॅक स्पॉट असल्याचे दिसून आले. संबंधित यंत्रणांच्या माध्यमातून या ठिकाणी सुधारणा करण्यात येणार आहे. या परिसरातील नो पार्किंगमध्ये तसेच रस्त्यांवर उभ्या ट्रकचालकांविरुद्ध पथक कारवाई करतील. तसेच परिसरातील ढाबे व हॉटेलमध्ये अवैधपणे दारू विक्री करणाऱ्या विक्रेत्यांवरही पोलिसांचे 'वॉच' असेल. त्यांच्याविरुद्ध कठोर कारवाईचे निर्देश पोलिस आयुक्तांनी दिले आहेत.

'दर आठवड्याला आढावा'

गेल्यावर्षी पोलिसांनी गुन्हेगारीवर नियंत्रण मिळवण्यात मोठ्या प्रमाणात यश मिळवले. २०२१च्या तुलनेत यावर्षी पहिल्या दीड महिन्यात खून, चेन स्नॅचिंग, दुखापत व घरफोडीच्या घटना कमी झाल्या. आता अपघातावर नियंत्रण मिळविणे हे आमचे लक्ष्य आहे. त्यासाठी विशेष पथक स्थापन करण्यात आले असून, या पथकाने काय कारवाई केली याचा आढावा दर आठवड्याला घेण्यात येईल. त्यानुसार उपाययोजना करण्यात येतील, असे पोलिस आयुक्त अमितेशकुमार यांनी सांगितले.

## दरोडा टाकणाऱ्या अण्णा गँगविरुद्ध मोक्काची कारवाई



कोल्हापूर : शाहूवाडी तालुक्यातील तळवडे येथे दरोडा टाकणाऱ्या अण्णा गँगविरुद्ध मोक्काची कारवाई करण्यात येणार आहे. अण्णा गँगने डिसेंबर २०२१ मध्ये दरोडा टाकला होता. पोलिसांनी अण्णा गँगच्या मुसक्या आवळण्यास सुरुवात केली आहे.

या गँगमधील सदस्य सराईत गुन्हेगार असून त्यांच्यावर पुणे ग्रामीण, पुणे शहर, नवीन मुंबई, मुंबई या शहरामध्ये खून, दरोडा, मारामारी, चोऱ्या अशा गंभीर स्वरुपाचे गुन्हे असल्याने या गँगच्या विरोधात मोक्का कारवाई करावी, असा आदेश दिला होता. त्यानुसार अतिरिक्त पोलीस उपअधीक्षक तिरुपती काकडे, शाहूवाडी पोलीस उपअधीक्षक रवींद्र साळोखे, शाहूवाडीचे पोलीस निरीक्षक विजय पाटील यांनी प्रस्ताव तयार करुन तो पोलीस अधीक्षकांच्या मार्फत विशेष पोलीस महानिरीक्षकांकडे पाठवला होता. त्यानंतर नऊ जणांविरोधात मोक्काची कारवाई करण्यात येणार आहे.

# मुलीच्या व्हॉट्सॲप स्टेटसवरुन वाद झाला अन् आईने जीव गमावला



मुलांच्या मोबाइलमधील व्हॉट्सअप स्टेटसवर ठेवण्यात आलेल्या छायाचित्रावरून कुटुंबात झालेल्या भांडणामध्ये एका आईला जीव गमवावा लागल्याची घटना बोईसर येथील शिवाजी नगरमध्ये घडली. या प्रकरणी बोईसर पोलिस ठाण्यात सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

बोईसर शिवाजीनगर येथे राहणाऱ्या लीलावती देवी प्रसाद (४८) या महिलेला १० फेब्रुवारी रोजी रात्रीच्या वेळी त्यांच्या राहत्या घरी सात ते आठ जणांनी मारहाण केल्यामुळे त्यांना जबर दुखापत झाली होती. त्यांना उपचारार्थ बोईसर एमआयडीसीमधील तुंगा रुग्णालयामध्ये दाखल करण्यात आले होते. मात्र शनिवारी उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. मृत महिलेच्या मुलीने काही दिवसांपूर्वी मोबाइल व्हॉट्सअप स्टेटसवर ठेवलेल्या छायाचित्रावरून मनात राग धरून कॉलेजमध्ये तिचे भांडण झाले होते. या भांडणाचे पडसाद तिच्या राहत्या घरी पोहोचले. या भांडणाचे रूपांतर हाणामारीत झाले. एका कुटुंबातील सहा जणांनी इकबाल प्रसाद यांच्या कुटुंबातील मुली व त्यांची पत्नी लीलादेवी यांना मारहाण केली. त्याचवेळी बोईसर पोलिस ठाण्यात तक्रार देण्यासाठी गेले असता पोलिसांनी कोणतीच कारवाई न करता आरोपींना सोडून दिले होते, असे मृत महिलेच्या मुलीने सांगितले.

जोपर्यंत बोईसर पोलिस आरोपींना ताब्यात घेऊन गुन्हा दाखल करून अटक करत नाहीत, तोपर्यंत मृतदेह अंत्यसंस्कारासाठी घेऊन जाणार नसल्याची भूमिका लीलादेवी प्रसादचे पती व मुलीने भूमिका घेतल्याने परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. सायंकाळी उशिरा शिवाजीनगर येथे झालेल्या या घटनेमध्ये सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपींना अटक करण्यात येईल, असे बोईसर पोलिस ठाण्याचे निरीक्षक सुरेश कदम यांनी सांगितल्यानंतर नातेवाइकांनी मृतदेह अंत्यविधीसाठी स्वीकारला.

# तीन हजार रुपयांवरुन वाद, नातवाकडून आजोबांची हत्या, कुटुंबीय म्हणतात आईच्या दुसऱ्या लग्नाने मुलगा बिथरलेला

मुंबई : नातवानेच आजोबांची हत्या (Grand Son killed Grand Father) केल्याची धक्कादायक घटना मुंबईतील वडाळा परिसरात उघडकीस आली आहे. डोक्यात बांबूने वार करुन तरुणाने वृद्धाचा जीव घेतला. या प्रकरणी नवी मुंबईजवळच्या पनवेल शहरातून एका 22 वर्षीय तरुणाला अटक (Navi Mumbai Crime) करण्यात आली आहे. उधार घेतलेले पैसे परत करण्यावरुन झालेल्या वादावादीतून नातवाने आजोबांचा जीव घेतल्याचा आरोप (Murder) आहे. मुंबई क्राईम ब्रँचने प्राथमिक तपासानंतर आरोपी नातवाला बेड्या ठोकल्या. लक्ष्मण कानुजी घुगे असं मयत आजोबांचे नाव आहे. आरोपी सुशांत राम सातपुते याने आधी घेतलेले 3,000 रुपये परत करण्यास आजोबांना सांगितले होते. लहानपणी कुशाग्र असलेला राम आईच्या दुसऱ्या लग्नानंतर बिथरला होता, असा दावा केला जातो.




**काय आहे प्रकरण?**

“आरोपी सुशांत राम सातपुते हा लक्ष्मण कनुजी घुगे यांचा नातू आहे. तो नवी मुंबईतील नेरुळ येथे त्याच्या आई-वडिलांसह राहतो. त्याला अंमली पदार्थांचे व्यसन असून तो गांजाचे सेवन करत असल्याचाही आरोप आहे. रामला काही महिन्यांपूर्वी ड्रग्ज रिहॅबिलिटेशन सेंटरमध्ये पाठवण्यात आले होते, पण तो तिथून पळून गेला आणि घरी परतला, असा त्याच्या कुटुंबीयांचा दावा आहे ” अशी माहिती प्रॉपर्टी सेलचे वरिष्ठ निरीक्षक शशिकांत पवार यांनी दिली.

**तीन हजारांवरुन वाद**

राम 8 फेब्रुवारी रोजी वडाळा येथील आजोबांच्या घरी आला होता. रात्री त्याने तिथेच मुक्काम केला होता. सकाळी आजोबांनी नातवाला पैसे परत करण्यास सांगितले, यावरुन दोघांमध्ये वाद झाला, असे पोलिसांनी सांगितले. रागाच्या भरात रामने घरातला बांबू उचलला आणि आजोबांच्या डोक्यात अनेक वेळा वार केले. त्यानंतर घराला बाहेरुन कुलूप लावून घटनास्थळावरुन तो पसार झाला.

**आजोबा रक्ताच्या थारोळ्यात**


“सकाळच्या भांडणाची माहिती शेजाऱ्यांनी रामच्या कुटुंबीयांना दिली. त्यानंतर आरोपीची आई आणि आजी नेरूळहून वडाळा येथे आल्या. 9 फेब्रुवारी रोजी सकाळी 11 वाजताच्या सुमारास मायलेकी घरी आल्या, तेव्हा त्यांना आजोबा रक्ताच्या थारोळ्यात पडलेले दिसले” असेही पोलिसांनी सांगितले. तिने घुगेंना शेजाऱ्यांच्या मदतीने जवळच्या रुग्णालयात नेले, मात्र तिथे दाखल करण्यापूर्वीच त्यांना मृत घोषित करण्यात आले. त्यानंतर वडाळा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

**सीसीटीव्ही कॅमेरांमुळे तपास**

“त्यानंतर पोलिसांच्या पथकाने परिसरातील सीसीटीव्ही स्कॅन केले, तेव्हा आरोपी नातू वडाळा स्टेशनच्या दिशेने गेल्याचे आढळले. रेल्वे स्थानकावरील कॅमेरे तपासले असता तो पनवेलकडे निघाले असल्याची माहिती मिळाली. त्यानंतर शनिवारी रात्री पोलिसांच्या पथकाने त्याला पकडले आणि भायखळा येथील युनिटच्या कार्यालयात आणले” असे पोलिस अधिकाऱ्याने सांगितले.

# धक्कादायक! 12 वर्षाच्या मुलाला 140 उठाबशांची शिक्षा; रुग्णालयात केले दाखल

बालगृहातील त्या मुलाचे वय वर्षे केवळ १२. अभ्यास केला नाही म्हणून त्याला ऊठाबशा काढण्याची शिक्षा त्याच बालगृहातील १७ वर्षीय मुलाने दिली. आकडे चुकले तर पुन्हा नव्याने मोजणी सुरू व्हायची. तो ऊठाबशा काढतच राहिला. अखेर थकल्याने चक्कर येऊन खाली कोसळला. चालणेही कठीण झाल्याने त्याला मेयो रुग्णालयात भरती करण्यात आले. उपचारानंतर त्याला परत बालगृहात नेण्यात आले. बालगृहाने दोन दिवस हा प्रकार लपवून ठेवल्याचा आरोप त्या मुलाच्या आईने केला. पाटणकर चौकातील शासकीय बालगृहात हा धक्कादायक प्रकार घडला.सरिता (बदललेले नाव) या आजारपण आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम नसल्याने मुलाचा सांभाळ करण्यास असमर्थ आहेत. चाइल्ड



लाइनच्या सहकार्याने अखेर त्यांच्या १२ वर्षांच्या मुलाला २१ जानेवारी रोजी बालगृहात ठेवण्यात आले होते. उठाबशा काढावयास लावण्याचा हा प्रकार ११ फेब्रुवारी रोजी घडला. मात्र, बालगृह प्रशासनाने त्या मुलाला कुठलेच उपचार दिले नाही. असे प्रकार होतच असताच, असे म्हणून त्याकडे दुर्लक्ष केले. आपल्या मुलाला भेटण्यासाठी त्याची आई रविवारी बालगृहात गेल्यानंतर तो मुलगा चालूच शकत नसल्याचे त्यांच्या लक्षात आले. बालगृहातील कर्मचाऱ्यांनी मात्र मुलगा पडल्याचे खोटे कारण सांगितले. मात्र, त्या मुलाने आईला सर्व हकिकत सांगितल्याने हा प्रकार उघडकीस आला.

बालविकास विभागाकडून चौकशी

बालगृहातील कर्मचाऱ्यांकडून मुलास उठाबशा काढावयास लावल्याचा प्रकार लपविण्यात येत असल्याचे लक्षात येताच आईने रोष व्यक्त केला. कर्मचाऱ्यांनी उडावाउडवीची उत्तरे दिली.

बालगृहातील कर्मचाऱ्यांकडून कुठलाच प्रतिसाद मिळत नसल्याने महिला व बालविकास विभागाकडे लेखी तक्रार करण्यात आली. बालसंरक्षण अधिकाऱ्यांच्या चमुने बालगृहाला भेट दिली. या प्रकरणाची चौकशी सुरू असून योग्य ती कार्यवाही करण्यात येईल, असे महिला व बालविकास विभागाकडून सांगण्यात आले.

बालगृहातील सुरक्षा धोक्यात

ज्या मुलाने उठबशा काढायला लावल्या त्या मुलाकडून बालगृह प्रशासनाने माफीनामा लिहून घेतल्याची माहिती आहे. त्याला समज देण्यात आली असल्याचे सांगण्यात आले. मात्र बालगृहातील प्रशासनाने केलेल्या दुर्लक्षामुळे बालकांची सुरक्षा धोक्यात आली असल्याचा ठपका ठेवण्यात येत आहे. मेयो रुग्णालयात मुलाला आणल्यानंतरही केवळ २० उठबशा काढल्याची माहिती बालगृहाकडून देण्यात आली. उपस्थित डॉक्टरांनी बालगृह प्रशासनाला खडसावले. पोलिसांत तक्रार करण्याचा सल्लाही देण्यात आला असल्याचे सरिता यांनी सांगितले.

# भीषण अपघातात तीन मित्र ठार; जोरदार धडकेमुळे कारचाही चक्काचूर!

अहमदनगर : ट्रॅक्टरला दोन ट्रॉली जोडून केली जाणारी उसाची असुरक्षित वाहतूक धोकादायक ठरत आहे. शनिवारी मध्यरात्रीच्या सुमारास श्रीगोंदा तालुक्यात अशाच एका ट्रॉलीला कारची धडक बसून तीन मित्रांचा मृत्यू झाला. आपल्या एका मित्राला काष्टीला सोडवण्यासाठी हे तिघे निघाले होते. श्रीगोंदा ते काष्टी रोडवर झालेल्या या अपघातात तिघेही ठार झाले. जोरदार धडकेमुळे त्यांच्या कारचाही चक्काचूर झाला आहे. (Ahmednagar Accident Latest News)



श्रीगोंदा तालुक्यातील तीन मित्र राहुल सुरेश आळेकर (वय २२, रा श्रीगोंदा), केशव सायकर (वय २२, रा. काष्टी) आणि आकाश रावसाहेब खेतमाळीस (वय १८, रा. श्रीगोंदा) हे या अपघातात ठार झाले. केशव सायकर श्रीगोंद्याला आला होता. त्याला काष्टीला परत सोडवण्यासाठी शनिवारी रात्री हे तिघेही कारने निघाले होते. रस्त्यात उसाने भरलेला ट्रॅक्टर जात होता. अंधारात कारचालकाला त्याचा अंदाज आला नाही. त्यामुळे ट्रॅक्टरला पाठीमागील बाजूने कारची जोराची धडक बसली. यामध्ये तिघांताही मृत्यू झाला. रात्री एकच्या सुमारास हा अपघात झाला.

नगर जिल्ह्यात साखर कारखान्यांच्या परिसरात उस वाहतूक करण्यासाठी ट्रॅक्टरला दोन ट्रॉली जोडून केली जाणारी असुरक्षित वाहतूक धोकादायक ठरत आहे. यापूर्वीही असे अनेक अपघात झाले आहेत. परिवहन अधिकारी आणि पोलीसही या असुरक्षित आणि बेकायदेशीर वाहतुकीकडे सोयीस्कर दुर्लक्ष करतात. दिवसा वाहतुकीला अडथळा ठरणारे हे ट्रॅक्टर रात्रीच्या अंधारात अपघाताचे कारण ठरत आहेत.

# पिडीतेला स्मृतीदिनी मिळाला न्याय; आरोपी विकेश नगराळेला जन्मठेपेची शिक्षा



वर्धाः हिंगणघाट जळीतकांडात आरोपी विकेश नगराळे याच्यावर न्यायालयाने बुधवारी खुनाचा गुन्हा सिद्ध केल्यानंतर आज न्यायालयाने आरोपीला जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली आहे. हिंगणघाट जिल्हा सत्र न्यायालयाने आज ही शिक्षा सुनावली आहे. न्यायलायत विकेश नगराळेविरोधात ७२ पानांचे आरोपपत्र दाखल करण्यात आले आहे.हिंगणघाट येथील जळीतकांडाला आज दोन वर्ष पूर्ण झाली आहेत. आरोपीने भोगलेल्या दोन वर्षांचा कालावधीला शिक्षेतून सूट मिळणार नसल्याचे न्यायालयाने नमूद केले आहे. तसंच, आरोपीला पाच हजारांचा दंड भरावा लागणार आहे. हिंगणघाट जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयाने न्यायाधीक्ष आर.बी. भागवत यांनी शिक्षा सुनावली आहे.

हिंगणघाटपासून १५ किलोमीटर अंतरावरील दरोडा येथील प्राध्यापिकेला जिवंत जाळण्यात आले होते. या घटनेनंतर समाजमन संतप्त होऊन रस्त्यावर आले होते. मोर्चे, आंदोलन करून घटनेचा निषेध नोंदविण्यात आला होता.

हिंगणघाट जळीतकांडाचा बुधवारी निकाल जाहीर होण्याची शक्यता होती. मात्र, न्यायालयाने विकेश नगराळेला दोषी ठरवत गुरुवारी शिक्षा जाहीर होणार असल्याचे म्हटलं होतं. त्यानुसार खुनाचा गुन्हा सिद्ध झाल्याच्या दिवशीच शिक्षा सुनावली जाऊ नये, असे सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश आहे. त्यामुळे आज आरोपी विकेश नगराळेला आजन्म कारावासाची शिक्षा सुनावण्यात आली आहे.

न्यायालयाने आरोपी विक्की नगराळेला शिक्षा सुनावल्यानंतर पिडीतेला न्याय मिळाल्याचे भावना व्यक्त होत आहे.

न्यायलायाच्या निकालाने समाधानी असल्याचे मत पीडितेच्या आई- वडिलांनी व्यक्त केलं आहे. तसंच, आज पीडितेचा स्मृतीदिन असल्याने आजच्याच दिवशी आरोपीला शिक्षा ठोठावल्यामुळं पिडीतेच्या आई-वडिलांना भावना अनावर झाल्या होत्या.

काय घडले होते?

पीडिता हिंगणघाटच्या स्व. आशा कुणावार महिला महाविद्यालयात वनस्पतीशास्त्र विषयाची अर्धवेळ प्राध्यापक म्हणून कार्यरत होती. यामध्ये पीडिता ३ फेब्रुवारीला २०२० ला सकाळी तिच्या गावाहून बसने हिंगणघाटला पोहोचली. नंदोरी चौकातून कॉलेजच्या दिशेने जाताना आरोपी विकेश नगराळे दबा धरुन बसला होता. पीडिता दिसताच विकेशने अगोदरच दुचाकीतील काढलेले पेट्रोल तिच्यावर ओतले आणि तिला पेटवले. यात गंभीररित्या जळालेल्या पीडितीचा नागपूरातील ऑरेंजसिटी रुग्णालयात मृत्यू झाला.

MIRA BHAINDAR MUNICIPAL CORPORATION
COMPUTER DEPARTMENT
Indira Gandhi Bhavan, ChattrapatiShivajiMaharajMarg, Bhayander (W) -401101
Tal.Dist. Thane 401101

MBMC/COMPUTER/ 512 /2021-22 Date: - 14/02/2022

**//Quotation Notice //**

Mira Bhaindar Municipal Corporation invites sealed Quotation for following works. The Blank form and other relevant document will be available for download on MBMC website as from dt. 16/02/2022 to dt. 24/02/2022 till 1.00 p.m. Form fee and EMD should be submitted through offline, failing which the Quotation will be disqualified.

The last date for submission of Quotation computed in all respects on dt. 24/02/2022 up to 1.00 p.m. in the above mentioned website. If possible the Quotation shall be opened in the presence of their bidders or there representative on the dt. 25/02/2022 up to 1.30 p.m. at the Computer Department of Mira Bhainder Municipal Corporation.

Hon. Commissioner of Mira Bhainder Municipal Corporation has reserve right to reject any or all offline bids, without assigning any reasons.

| Sr. No. | Name of work | Estimated Amount in Rs. | Cost of Quotation Documents (in Rs.) | Earnest Money Deposit (EMD) |
|---|---|---|---|---|
| 1) | Supply and Implementation of Online Salary Administrative Module to MBMC | Rs.9,50,000/- (Including GST) | Rs. 3,200/-+ Rs.576/- (18% GST) = Rs.3,776/- (Non Refundable) | Rs. 16,000/- (Refundable) |

**Note:-** Quotation Submission is offline only.

सही/ -
(R.M.Gharat)
System Manager
Mira Bhainder Municipal Corporation

जा.क्र मनपा/जनसंपर्क/५१७/२०२१-२२
दिनांक १४/०२/२०२२

## संपादकीय...



# प्रस्थापितांतील बंडखोर

देशाचे गृहमंत्री साक्षात अमित शहा यांना 'तुमच्या राज्यात दहशतीचे वातावरण आहे' असे सुनावण्याची हिंमत असलेले राहुल बजाज हे प्रस्थापित उद्योगपतींतील बंडखोर. ही बंडखोरीची खुमखुमी बहुधा त्यांच्यात मराठी संबंधांतून आली असावी. असे काही केल्याखेरीज त्यांना स्वस्थ बसवत नसे. आपल्या उद्योगपतींच्या सतत सत्ताशरण जगात आपण एकटे पडतो याचीही जाणीव त्यांना असे. 'मला बळी जाताना पाहणे तुम्हास आवडते' असे आपल्या सहव्यावसायिकांनाही सुनावण्यास ते कमी करीत नसत. तीन वर्षांपूर्वी २०१९ साली आर्थिक दुर्गतीसाठी सरकारी धोरणांस जबाबदार धरण्याच्या धाडसी कृत्यानंतर तेच झाले. या प्रसंगी उपस्थित असलेल्या अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी बजाज यांची टीका ही 'राष्ट्रविरोधी भावनांस' कशी खतपाणी घालू शकते अशी प्रतिक्रिया व्यक्त केल्यावर आपली सुरक्षा हीच देशाची सुरक्षा असे मानणाऱ्या अन्य उद्योगपतींनी सीतारामन यांच्या सुरात सूर मिसळला. पण तरीही राहुल बजाज डगमगले नाहीत. 'आम्ही देशविरोधी नाही, तुमच्या इतकेच देशप्रेमी आहोत.' असे बाणेदार उत्तर या उद्योगपतीने दिले आणि वर करोना-कालीन टाळेबंदी लादून अर्थविश्वाचा गळा घोटू नका असेही सुचवले. त्यानंतर समाजमाध्यमांतील बिनडोक जल्पकांच्या झुंडींनी त्यांच्याविरोधात रान उठवले. पण माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांच्या धोरणलकव्याविरोधात आवाज उठवणारेही राहुल बजाज होते, याचा सर्वांनाच सोयिस्कर विसर पडला. तरीही त्याची आठवण करून देण्याची गरज राहुल बजाज यांना वाटली नाही. हे असे एकटय़ाने, ठामपणे, स्वत:वर पूर्ण विश्वास दाखवत उभे राहणे हे त्यांच्या मोठेपणाचे एक इंगित.

अन्यथा अमेरिकेत हार्वर्डला शिकून आलेले, संपूर्ण शहरी तोंडवळा असलेले नवविवाहित राहुल यांनी आकुर्डीसारख्या तत्कालीन ओसाड परिसरास आपले घर मानले नसते. आजही जातिवंत पुणेकर शहराची हद्द शनिवारवाडय़ाशी संपते असेच मानतो. शहरातून पिंपरी आदी परिसरात बदली झाल्यास त्याचे प्राण कंठाशी येतात. अशा वेळी ५५ वर्षांपूर्वी, १९६५च्या आगेमागे मुंबईतील सुखासीन आयुष्य सोडून 'बजाज ऑटो' घडवण्यासाठी राहुल यांनी त्या वेळी गावठाणही नसलेल्या, माळरानी आकुर्डीतील कारखान्यालाच आपले घर मानले. वास्तविक मुंबईत राहून जा-ये करण्याची सुविधा त्यांना होती. पण मी माझ्या कामगारांजवळच राहणार ही त्यांची इच्छा. तेथेच, कंपनीच्या आवारातच त्यांनी घर बांधले आणि राहुल-रूपा हे पतीपत्नी कामगारी वातावरणातच रमले. तीन तीन पाळय़ांत सुरू असणाऱ्या कारखान्याच्या परिसरालाच घर मानणे हे आज वाटते तितके सोपे नाही. ते याबाबत इतके ठाम होते की पुण्यात राहण्याचा शिष्टसंमत पर्यायही त्यांनी निवडला नाही. त्यांच्या पत्नी रूपा या मराठी. 'आयसीएस' अधिकाऱ्याची कन्या. त्यांची मध्यमवर्गीय मूल्ये त्या कमलनयन बजाज यांची सून झाल्यावरही कायम होती. त्याचमुळे राजीव, संजीव आणि कन्या सुनयना या त्यांच्या अपत्यांचेही बालपण मराठी वातावरणातच गेले आणि त्याचा कोणताही कमीपणा या कुटुंबास वाटत नाही. हे सर्वच उत्कृष्ट मराठी बोलतात आणि नाटय़गीतेही ऐकतात. छटाकभर यशाने हुरळून जात आपली मातीशी असलेली नाळ नाकारणारे आसपास उदंड असताना देशातील दुचाकी उद्योगाच्या या एकेकाळच्या अनभिषिक्त सम्राटाचे 'जसा आहे तसा'च दाखवणारे वर्तन लोभस होते. हे झाले व्यक्तिगत. उद्योगपती म्हणून राहुल बजाज त्या काळाच्या पुढे होते. समाजवादी वातावरणात मुळात उद्योग स्थापणेच अवघड. सर्व कायदेकानूंचे




पालन करण्यातच रक्त आटत असे. अशा वातावरणात वडिलांचा हात सोडून राहुल यांनी दुचाकी आणि तिचाकी वाहनांची मुहूर्तमेढ रोवली. कमी किंमत आणि उत्तम दर्जा हे त्यांच्या वाहनांचे वैशिष्टय़. वास्तविक दुचाकी आणि तिचाकी बाजारात त्यांची मक्तेदारी होती. तिचा फायदा घेत त्यांना वाटेल तशी किंमतवाढ करता आली असती. तसे त्यांनी केले नाही. त्यामुळेच मक्तेदारीविरोधातील सरकारी खात्यास १९७१ सालीदेखील राहुल बजाज यांच्या उद्योग व्यवहाराचे कौतुक करावे लागले. त्या वेळी 'बजाज'ची 'प्रिया' स्कूटर मध्यमवर्गाची प्रगती निदर्शक होती तर 'चेतक'धारी घर हे प्रगती साध्य केलेल्यांचे चिन्ह होते. हा 'मारुती' वाहनांच्याही आगमनाआधीचा काळ. पेडल मारत सायकल आणि आयुष्य ढकलणाऱ्या मध्यमवर्गास राहुल यांच्या स्वयंचलित दुचाकींनी गती दिली. त्याकाळी मालकीची स्कूटर असणे हेदेखील स्वप्न असे. राहुल बजाज हे या मध्यमवर्गीय स्वप्नांचे सौदागर.

# चेतना चिंतामणीच्या गावी...



गेली आठ दशके तो सूर ईश्वराच्या आराधनेपासून ते विरहाच्या वेदनेपर्यंत कुठल्याही क्षणासाठीचे आपले भाव, आपल्याहूनही अधिक आर्ततेने व्यक्त करीत, आपली सोबत करतो आहे. तो चिरतरुण सूर ज्या अद्भूत कंठातून उमटतो, त्या कंठाची मालकी ज्याच्याकडे होती, तो ९२ वर्षांचा देह अखेरच्या क्षणांमध्ये काय विचार करीत असेल? तुकोबाच्या शब्दांत आणि स्वत:च्याच आवाजात 'तैसे झाले माझ्या जीवा, केंव्हा भेटसी केशवा' म्हणत 'अगा करुणाकरा' असा धावा करीत असेल का? कुणी पाहिले आहे, अखेरच्या काही क्षणांचे हे चिंतन! जो पाहतो, तो त्या चिंतनानंतर चिंतनाच्या पलीकडे जातो. लता मंगेशकर नावाचा सात अक्षरी चमत्कार सप्तसुरांच्या पालखीत बसून, सप्त आकाश ओलांडून असे चिंतन करीतच अस्ताला गेला आहे; स्वरांच्या लक्षावधी भरजरी लडी मागे ठेवून. अचूकतेचेही मोजमाप ज्या सुरांनी करता यावे, असा अक्षय सूर मागे ठेवून. पन्नासच्या दशकापासूनच्या पुढील सर्व पिढ्या आणि लता मंगेशकर यांच्या नंतरच्याही अनेक पिढ्या या स्वरवैभवाची श्रीमंती सांगतच जगणार आहेत.

गीत-संगीत हा भारतीय जीवनशैलीचा एक अनिवार्य भाग आहे. माणसाच्या जन्मापासून ते मृत्यूपर्यंत त्याच्या आयुष्यातील प्रत्येक टप्प्यावरील महत्त्वाच्या प्रसंगी कुठल्या ना कुठल्या प्रकारे संगीत त्याची सोबत करीत असते. त्यामुळेच, मानवी आयुष्यातील घटनांचे चित्रण करणाऱ्या, मानवी आयुष्यांच्याच अद्भूत कथा सांगणाऱ्या नाटक-चित्रपटांमधून गीत-संगीताचा वापर गरजेचा झाला. भारतीय चित्रपटांनी ज्या पद्धतीने ही परंपरा आत्मसात केली, आपलीशी केली तशी जगातल्या कुठल्याही चित्रपटांनी केली नाही. चित्रपट बोलका-गाता होऊन ९१ वर्षे झाली, त्यातील जवळपास ७० वर्षे लता मंगेशकर यांचा 'आवाज' शेकडो नायिकांच्या हजारो गाण्यांमधून पाझरतो आहे. 'या जगात केवळ तीन गोष्टी आहेत, चंद्र, सूर्य आणि लताचा स्वर,' असे पु. ल. देशपांडे म्हणाले होते. सूर्य अनेक आहेत आणि चंद्र शेकडो आहेत, हे सत्य काळाच्या ओघात जगाला कळलेच आहे. लता मात्र एकच होती, एकच राहणार आहे.

मंगेशकरांचे अवघे घराणेच दैवी स्वरांची झळाळी लाभलेले. मास्टर दीनानाथांच्या स्वर्गीय संगीताचा वारसा घेऊन जन्माला आलेली मंगेशकर भावंडे हे भारताच्या आणि मराठीच्या ललाटीचे वैभवच. लता मंगेशकर हा या वैभवाचा शिरोमणी. लता मंगेशकर एकाच आयुष्यात अनेक आयुष्ये जगल्या आणि प्रत्येक आयुष्याचे टोक त्यांनी अनुभवले. गरीबी आणि अभावाचा काळ होता, तेव्हा त्यांनी सर्व प्रकारची अवहेलना सहन केली. इवल्याशा खांद्यांवर भावंडांचा सांभाळ करण्याची जबाबदारी येऊन पडली, तेव्हा चित्रपटांत किरकोळ भूमिका करण्यापासून सगळी कामे त्यांनी केली. प्रत्येक लहानसहान गोष्टींमध्ये असलेला परिपूर्णतेचा ध्यास, गाण्याची उपजत समज आणि तरीही कठोर मेहनतीची तयारी, त्यांना या संकटांतून सामर्थ्याकडे घेऊन गेली. या सामर्थ्यानेच पुढे संगीताचे अवघे आकाश व्यापून टाकले. हिंदी चित्रपटसृष्टीत पार्श्वगायिका होण्यासाठी त्यांची धडपड सुरू होती, तो काळ होता अनुनासिक, भारदस्त आवाजांचा. त्या काळाची गरज, संगीतकारांची शैली पाहता तेव्हाचे आवाजाचे चलनच तसे होते. अशा काळात लताचा आवाज ऐकल्यावर काहींनी 'बहुत पतला सूर है' अशी नापसंती व्यक्त केली होती. साहजिकच, लताच्या शब्दोच्चारांना मराठीचा गंध होता आणि उर्दूच्या नजाकतीने लदबदलेल्या त्या काळातील गाण्यांना तो पसंत पडणार नव्हता. 'उसकी आवाज को वरण-भात की बू आती है,' अशी हेटाळणी झाली. लताचे कान हे सगळे ऐकत होते, मन हे सगळे टिपत होते आणि मग उर्दूची शिकवणी लागली. शब्द, अर्थ घोटले जाऊ लागले, भाषा आत्मसात केली जाऊ लागली. 'दीपक बगैर कैसे परवाने जल रहे है' या ओळी गाताना, बगैर या शब्दांत 'गै' या अक्षराखाली असलेला नुक्तादेखील लताच्या आवाजाने 'गाऊन' दाखवला आणि सगळे नापसंतीचे आवाज, हेटाळणीचे स्वर एका क्षणात कडीकुलपात बंद झाले, ते कायमचेच. पुढे 'बरसात'नंतर लताला गाण्यांची गरज राहिली नाही, तर गाण्यांनाच लताची गरज भासू लागली. उंच पट्टीतही कणभरही बेसूर न होणारा लता मंगेशकरांचा स्वर पार्श्वगायनाला अशा उंचीवर घेऊन गेला, की जिथे अन्य कोणी पोहोचणे शक्यच नाही.

व्हायोलिनच्या ताफ्यातील शेकडो वादकांपैकी कुणाचा सूर चुकला, हे क्षणभरात ओळखण्याचे कान त्यांच्याकडे होते. गाणे गाण्यापूर्वी स्वत:च्या हस्ताक्षरात लिहून, त्यात कुठे पूर्णविराम आहे, कुठे अर्धविराम आहेत हे तपासून घेणे, प्रत्येक शब्दाचा अर्थ समजून घेणे, चित्रपटात त्या गाण्याचा संदर्भ काय आहे, नायिका कोण आहे, याची माहिती घेणे, यातून त्यांचे प्रत्येक गाणे परिपूर्ण झाले. उर्दूचे महत्त्व लताला जसे संगीतकार गुलाम हैदर यांनी सांगितले होते, तसे गाण्यातील विरामचिन्हांचे महत्त्व संगीतकार अनिल विश्वास यांनी सांगितले होते. 'चाल कितीही अवघड असो, पट्टी कितीही उंच असो, लता गाताना श्वास कधी घेते, तेच कळत नाही,' हे कौतुक आणि आश्चर्य सहजासहजी वाट्याला आलेले नव्हते. एखादा प्रयोग करण्याचे मनात येण्याच्या क्षणीच संगीतकाराच्या मनात गायिका म्हणून लताचे नाव आपोआप येऊ लागले.

हयातीतच दंतकथा होण्याचे भाग्य लता मंगेशकरांना लाभले होते. 'एकदा उस्ताद बडे गुलाम अली खाँ रेडिओवर लताचे 'ये जिंदगी उसी की है' हे 'अनारकली'मधले गाणे ऐकत होते, तेव्हा ते गहिवरून म्हणाले 'कम्बख्त, ये लडकी कभी बेसुरी नहीं होती!' किंवा, 'निर्माते-दिग्दर्शक मेहबूब खान एकदा गंभीर आजारी असताना, त्यांनी रुग्णालयातून फोन केला आणि 'रसिक बलमा' हे गाणे फोनवरून ऐकविण्याची विनंती लताला केली होती.' यासारखे लाखो-हजारो किस्से लताच्या नावावर आहेत. त्यातले खरे-खोटे जाणून घेण्याऐवजी, आपण त्यात लताच्या महानतेचा साक्षात्कार पाहतो. संगीतकारांबरोबरची भांडणे, वाद-विवाद यांच्याही अनेक कथा आहेत. लता मंगेशकर या सगळ्यांच्या पार पलीकडे, खूप उंचीवर विराजमान होत्या आणि चमत्कारांच्या एक एक लडी सहज उलगडत होत्या.

'जिस देश मे गंगा बहती है'मधील 'आ अब लौट चले' या गाण्यात उंच पट्टीत 'आजा रे' अशी साद घालायची होती, जणू साद घालण्याच्या मानवी क्षमतेची ती परिसीमा वाटावी. लताने ते करून दाखवले आणि तसे करताना आवाजातला गोडवा कणभरही हरवला नाही. 'रझिया सुलतान'मधील 'ऐ दिले नादां' या गाण्यात खालच्या पट्टीत, हृदयाला साद घालत, हळूहळू 'हम भटकते है, क्यों भटकते है' म्हणत वरच्या पट्टीत आसमंत ढवळून काढायचा होता. लताने तेही करून दाखवले, त्याच क्षमतेने. 'रझिया सुलतान'मधले हे गाणे संगीतकार खय्याम यांनी ध्वनिमुद्रित केले आणि पुढे चित्रपट रखडला. दरम्यानच्या काळात या गाण्याची ख्याती संपूर्ण चित्रपटसृष्टीत अशी काही पसरली होती, की अनेकांनी खय्याम साहेबांना गळ घालून, त्यांच्या घरी जाऊन हे गाणे ऐकवण्याची फर्माईश करणे नित्याचेच झाले होते. लता मंगेशकर यांनी शेकडो संगीतकारांकडे गाणी गायली, त्यातील जवळपास प्रत्येक गाण्याची एक स्वतंत्र कथा होऊ शकेल. लता-मदन, लता-एसडी अशा जोड्यांच्या गाण्यांचीही चर्चा लाखो वेळा झालेली आहे. संगीतकाराने बांधलेल्या चालीत लताने एखाद्या हुंकाराची किंवा एखाद्या आलापीची, तानेची भर घातल्यावर त्या गाण्याचे सौंदर्य कसे वाढले, याचेही शेकडो किस्से असतील;

कारण प्रत्येक संगीतकाराची लता वेगळी आहे, प्रत्येक नायिकेची लता वेगळी आहे आणि प्रत्येक रसिकाला आवडलेली लता वेगळी असते.

# कर्जबाजारीपणाला कंटाळून पती-पत्नीने केले विष प्राशन



वर्धा: जिल्ह्याच्या सेलू तालुक्यातील पिपंळगाव येथील शेतकऱ्याने कर्जबाजारीपणाला कंटाळून विष प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केला. यात पतीचा उपचारदरम्यान एक महिन्याने मृत्यू झाला तर पत्नीला रुग्णालयातून सुट्टी देण्यात आली आहे. पतीचा मृत्यू झाल्याने परिवार उघड्यावर आलं असून आर्थिक मदतीची मागणी केली जातं आहे.

अर्चना राजेंद्र चरडे यांनी आणि यांचे पती राजेंद्र चरडे यांनी ९ जानेवारीला संध्याकाळी राहत्या घरी विष प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केला. दोघांनी विष घेतल्याची माहिती मिळताच त्यांना सेवाग्राम येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले. रुग्णालयात पती-पत्नी दोघांवर उपचार करण्यात आले. यात काही दिवसात पत्नीला रुग्णालयातून सुट्टी देण्यात आलीय. मात्र घटनेच्या एका महिन्यानंतर पती राजेंद्र चरडे यांची प्राणज्योत मालवली. राजेंद्र यांच्याकडे केवळ दोन एकर शेती असून दोन लहान मुली आहेत. या घटनेनंतर सगळीकडे हळहळ व्यक्त केली जातं आहे.

राजेंद्र यांच्यावर सेवाग्राम येथील सेंट्रल बँकेचे ७० हजाराचे कर्ज होते. सोबतच त्यांनी इतर लोकांकडून कर्ज घेतल्याची माहिती आहे. तर पत्नी हिच्या नावाने सुद्धा उमेदच्या गटातून कर्ज काढलेले आहे. शेतीतून होणारे उत्पन्न आणि आर्थिक परिस्थितीला कंटाळून राजेंद्रने आत्महत्या केली आहे.

सरकारकडून शेतकऱ्यांसाठी विविध योजना आणल्या जातात मात्र या योजनाचा शेतकऱ्यांना प्रत्यक्ष लाभ मिळताना दिसत नाही.आर्थिक विवंचनेतून आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याला तातडीने मदत करण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

# पाच लाखांची एमडी पावडर जप्त



तळोजा येथील किरवली गावच्या हद्दीत एमडी (मेथ्यॅक्युलॉन पावडर) हा अंमली पदार्थ विक्री करण्यासाठी आलेल्या दोघांना अंमली पदार्थविरोधी पथकाने सोमवारी रात्री सापळा लावून अटक केली आहे. आमिन जाल मोहम्मद खान (३५) व बदरअली इरशाद अहमद शेख (३३) अशी या दोघांची नावे असून अंमली पदार्थ विरोधी पथकाने या दोघांजवळ असलेली ५३ ग्रॅम वजनाची ५ लाख ३० हजार रुपये किमतीची एमडी पावडर तसेच त्यांनी या गुन्ह्यात वापरलेली गाडी जप्त केली आहे. तळोजा येथील किरवली गावाजवळ शिळफाटा-पनवेल रस्त्यावर दोन व्यक्ती अंमली पदार्थाची विक्री करण्यासाठी येणार असल्याची माहिती अंमली पदार्थ विरोधी पथकाला मिळाली होती. या माहितीच्या आधारे अंमली पदार्थविरोधी पथकाने सोमवारी रात्री तळोजा येथील किरवले गावच्या हद्दीत सापळा लावला होता. रात्री सव्वा दहा वाजण्याच्या सुमारास त्याठिकाणी आमिन खान व बदरअली शेख हे दोघे गाडीमधून आले असता, अंमली पदार्थ विरोधी पथकाने त्यांच्यावर पाळत ठेवून त्यांची धरपकड केली. त्यानंतर गुन्हे शाखेने दोघांची झडती घेतली असता, आमिन खान याच्याजवळ प्लॅस्टिक पिशवीमध्ये २७ ग्रॅम एमडी पावडर तर बदरअली शेख याच्याजवळ २६ ग्रॅम एमडी पावडर आढळून आली. अंमली पदार्थ विरोधी पथकाने हे अंमली पदार्थ जप्त करून ते कुठून आणले, याबाबत दोघांकडे चौकशी केली असता, त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली.

# कोणी उठतो केंद्रातून आणि महाराष्ट्राची बदनामी करतो, भाजपवाले गांडुळासारखे..., संजय राऊतांचा घणाघात

मुंबई: शिवसेना म्हणजेच महाराष्ट्र आहे. शिवसेना हाच 11 कोटी मराठी माणसाचा आवाज आहे. कोणी उठतो केंद्रातून आणि महाराष्ट्राची बदनामी करतो. आणि इकडचे भाजपवाले गांडूळासारखे बसून असतात. महाराष्ट्र उठेल, महाराष्ट्र उसळेल, महाराष्ट्र अन्यायाविरुद्ध प्रतिकार करेल, असं शिवसेनेचे खासदार संजय राऊत म्हणालेत. त्यांचं (भाजपवाल्यांचं) लक्ष उद्या असायलाच पाहिजे. त्यांनी माजी उद्याची पत्रकार परिषद काळजीपूर्वक ऐकायलाच हवी. केंद्रीय तपास यंत्रणांचे जे प्रमुख आहेत, त्यांनी आवर्जून ऐकायला हवी, असंही संजय राऊतांनी अधोरेखित केलंय. शिवसेनेचे नेते संजय राऊत शिवसेना भवनाजवळ माध्यमांच्या प्रतिनिधींशी बोलत होते.

उद्या शिवसेना हा पक्ष बोलणार नसून उद्या महाराष्ट्र बोलणार आहे. उद्या मराठी माणूस बोलणार आहे. उद्या कळेल महाराष्ट्र काय आहे ते, तुमचे जे धंदे चालले आहेत ना ते उद्या कदाचित बंद होऊ शकतात, असंही संजय राऊत म्हणालेत. आता उपटसुंभ म्हणतील शिवसेना म्हणजे महाराष्ट्र आहे का, मी म्हणतो होय. शिवसेना म्हणजेच महाराष्ट्र आहे. शिवसेना हाच 11 कोटी मराठी माणसाचा आवाज आहे. कोणी उठतो केंद्रातून पंतप्रधान आणि महाराष्ट्राची बदनामी करतो. आणि इकडचे भाजपवाले गांडूळासारखे बसून असतात. महाराष्ट्र उठेल, महाराष्ट्र उसळेल, महाराष्ट्र अन्यायाविरुद्ध प्रतिकार करेल. महाराष्ट्र खोटारडेपणाविरुद्ध लढेल, असंही संजय राऊतांनी अधोरेखित केलंय. छत्रपती शिवाजी महाराजांचे आम्ही वंशज आहोत. हा वंश छत्रपती शिवाजी महाराजांचा आहे. आम्ही सेनाभवनाखाली बाळासाहेबांच्या छपराखाली आहोत. बाळासाहेब ठाकरेंनी आम्हाला लढण्याची मर्दानगी शिकवली आहे ना ती उद्या दिसेल. आमच्या रक्तातच धाडस आहे, आम्ही गांडूळ नाही आहोत. बाहेरच्या लोकांनी येऊन मराठी माणसाला दमदाट्या कराव्यात, असं होणार नाही. आम्ही लढू, स्वतः उद्धव ठाकरेंचं उद्याच्या



पत्रकार परिषदेवर बारीक लक्ष आहे. त्यांच्या सूचनेनुसारच उद्याची पत्रकार परिषद होणार आहे. ते जिथे बसणार आहेत, तिथून त्यांचं आम्हाला मार्गदर्शन मिळणार आहे, असंही संजय राऊतांनी सांगितलंय.

विशेष म्हणजे काही तासांपूर्वीही संजय राऊतांनी भाजपला आव्हान दिलं होतं.

पोलीस बातमी पत्र

संमिश्र

४

मुंबई, मंगळवार १५ ते २१ फेब्रुवारी २०२२

## जिल्हाधिकाऱ्यांच्या नावाने केली फसवणूक; कोट्यवधींच्या मालमत्तेचा काळा बाजार





लातूर: जिल्ह्यावर प्रशासकिय नियंत्रण ठेवण्याचे काम जिल्हाधिकारी करत असतात मात्र लातूरमध्ये चक्क जिल्हाधिकाऱ्यांच्या नावाचा वापर करून कोट्यवधींच्या मालमत्तेचा काळा बाजार केल्याची धक्कादायक बाब समोर आलीय. थेट बनावट अकृषी आदेश काढून त्या आदेशाच्या मदतीने कोट्यवधी रुपये किमतीच्या ११ प्लॉटचे खरेदीखत तयार करण्यात आल्याचं प्रकरण उघड झालंय. याप्रकरणी ५ जणांविरुध्द शहरातील शिवाजीनगर पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

हा प्रकार समोर येताच जिल्हाधिकारी व दुय्यम निबंधक कार्यालयाची फसवणूक केल्या प्रकरणी जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाने येथील सहदुय्यम निबंधक कार्यालयातील वर्ग २ चे प्रभारी सहदुय्यम निबंधक श्रीनिवास महादेवराव जगदाळे यांनी दिलेल्या तक्रारीवरून भागुनगरमधील रहिवाशी श्रीकांत चंद्रशेखर हिरेमठ, हरंगुळ मद्ये राहणारे सूर्यकांत महादेव खोबरे.

# आईला शिवी दिल्याचा राग, मुंबईत 21 वर्षीय तरुणाची हत्या, वर्गमित्राला अटक

मुंबई : आईला शिवी दिल्याच्या रागातून तरुणाने आपल्या शालेय मित्राची हत्या (School Friend Murder) केली. मुंबईतील अंधेरी पूर्व भागात हा धक्कादायक प्रकार (Mumbai Crime) घडल्याची माहिती आहे. खून प्रकरणी 22 वर्षीय तरुणाला रविवारी अटक करण्यात आली. रागाच्या भरात त्याने मित्राची हत्या केल्याचा आरोप आहे. या घटनेत 21 वर्षीय तरुणाला प्राण गमवावे लागले. महिन्याचा पगार झाल्यामुळे आरोपीने मित्राला पार्टीसाठी बोलावलं होतं. यावेळी दोघं जण मद्यपान करत होते. तेव्हा 21 वर्षीय तरुणाने आरोपीला त्याच्या आईवरुन शिवी घातली. याचा राग सहन न झाल्यामुळे आरोपीने मित्राची हत्या केल्याचा दावा केला जात आहे. दोघंही शालेय जीवनापासून मित्र असल्याची माहिती आहे.




**काय आहे प्रकरण?**

रागाच्या भरात मुंबईतील अंधेरी भागात 21 वर्षीय शाळकरी मित्राची हत्या केल्याच्या आरोपाखाली एका 22 वर्षीय तरुणाला रविवारी अटक करण्यात आली. दोघं मद्यधुंद अवस्थेत असताना मयत तरुणाने आरोपीच्या आईला शिवीगाळ केली होती. इंडियन एक्स्प्रेस वृत्तपत्राने यासंदर्भात बातमी दिली आहे.

मृत राहुल गायकवाड (21) आणि आरोपी सुशांत घोटकर (22) हे शाळेत असल्यापासून चांगले मित्र होते. राहुल बेरोजगार होता, तर आरोपी सुशांत हाऊसकीपिंगचे काम करत होता.

**पगाराच्या पार्टीनंतर वाद**

11 फेब्रुवारीला सुशांतला पगार मिळाल्याने दोघांनी पार्टी करण्याचा निर्णय घेतला. अंधेरी येथे तीन ठिकाणी त्यांनी मद्यपान केले. मद्यधुंद अवस्थेत मरोळ मरोशी रस्त्यावर फिरत असताना दोघांमध्ये वाद झाला. यावेळी राहुलने सुशांतच्या आईला शिवीगाळ केली. त्यामुळे चिडलेल्या सुशांतने संतापाच्या भरात राहुलला पेव्हर ब्लॉकने मारहाण केली. राहुलच्या डोक्यातून रक्तस्त्राव होत असल्याचे पाहून सुशांत घाबरला आणि त्यांनी घटनास्थळावरुन पळ काढला.

**उपचारांदरम्यान मृत्यू**

एका पादचाऱ्याने पोलिस नियंत्रण कक्षाला फोन करुन सांगितले, की डोक्याला मार लागल्याने एक व्यक्ती रस्त्यात बेशुद्ध पडली आहे. त्यानंतर पोलिस व्हॅन घटनास्थळी पाठवण्यात आली आणि राहुल गायकवाड याला कूपर रुग्णालयात दाखल करण्यात आले. डोक्याला मार लागल्याने 12 फेब्रुवारी रोजी राहुलचा उपचारांदरम्यान मृत्यू झाला. राहुलच्या फोनच्या मदतीने पोलिसांनी तो मरोळ भागातील आदर्श नगर येथील रहिवासी असल्याची ओळख पटवली. त्याच्या भावाच्या तक्रारीवरून खुनाचा एफआयआर दाखल करण्यात आला. तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे आम्हाला कळले की मयत तरुण आरोपीला शेवटचा भेटला होता. पुढील तपासानंतर आम्ही त्याला अटक केली, असे पोलीस निरीक्षक संजय गायकवाड यांनी सांगितले.

## बंदुकीच्या धाकावर विवस्त्र करून अश्लील कृत्य करायला लावायचे; विकृतांच्या टोळीला पोलिसांचा दणका

सोलापूर: जीवे मारण्याची धमकी देत, गावठी पिस्तूल आणि गुप्तीचा धाक दाखवून लोकांना अश्लील कृत्य करण्यास भाग पाडणाऱ्या चौघांच्या टोळीला शहर पोलिसांनी अटक केलीय. जोडभावी पेठ पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण विभागाच्या (डीबी) पथकाने ही कारवाई केली असून विकृतांच्या ताब्यातील २ लाख २० हजार ५०० रुपये किंमतीचा मुद्देमालही हस्तगत करण्यात आला आहे.सागर अरुण कांबळे (वय २२ रा. न्यू बुधवार पेठ भीम विजय चौक सोलापूर), बुद्धभूषण नागसेन नागटिळक (वय २६ रा. न्यू बुधवार पेठ आंबेडकर उद्यान समोर,आनंद चौक) सतीश उर्फ बाबूलाल अर्जुन गायकवाड (वय २५ रा. १२६, बुधवार पेठ मिलिंदनगर सोलापूर) अक्षय प्रकाश थोरात (वय २६ रा. मातोश्री रमाबाई आंबेडकर नगर न्यू बुधवार पेठ विश्वदीप चौक सोलापूर) असे गुन्हा दाखल झालेल्यांची तरुणांची नावे आहेत. डीबी पथकाचे प्रमुख सहायक पोलीस निरीक्षक केतन मांजरे यांना बातमीदारामार्फत माहिती मिळाली होती की, काही



तरुण जुना तुळजापूर नाका ते रुपाभवानी मंदिरादरम्यान येणाऱ्या जाणाऱ्या लोकांना त्यांच्या जवळील पिस्तुलाचा धाक दाखवून मारहाण, लुटमार करीत आहेत. मिळालेल्या माहितीवरून डीबी पथकाच्या पोलिसांनी रुपाभवानी मंदिराकडून जुना तुळजापूर नाकाकडे जाणाऱ्या सर्व्हिस रोडवर सापळा रचून चौघांना ताब्यात घेतले असता, त्यांच्याकडून एक गावठी पिस्तूल, धारदार गुप्ती,चार मोबाईल, दोन मोटारसायकली आढळून आल्या. मोबाइलमध्ये आढळलेल्या व्हिडिओची दोन पंचांसमक्ष तपासणी केली असता, त्यामध्ये गावठी पिस्तूलचे व धारदार गुप्तीचा रस्त्याने जाणाऱ्या येणाऱ्या लोकांना धाक दाखवणे, त्यांना मारहाण व दमदाटी करणे, जीवे ठार मारण्याची धमकी देऊन त्यांना विवस्त्र करणे, अनैसर्गिक अत्याचार करण्यास भाग पाडणे, शेण खाऊ घालणे असे विक्षिप्त प्रकार केल्याचे आढळून आले. रेकॉर्डिंग करण्यात आलेले व्हिडिओ व्हॉट्सॲपवर व्हायरल केल्याचे दिसून आले. याप्रकरणी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात या विकृत गँगवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आज त्यांना कोर्टात हजर केले जाणार आहे. त्यानंतरच त्यांच्या गुन्ह्याची सविस्तर उकल होणार आहे.

## धक्कादायक! गतिमंद तरूणीसोबत 5 महिन्यांपासून घडत होतं भयंकर

पालघर: पालघर जिल्ह्यात धक्कादायक घटना घडली आहे. एका ४८ वर्षीय व्यक्तीने गतिमंद तरूणीवर गेल्या ५ महिन्यांपासून वारंवार बलात्कार केल्याचे उघडकीस आले आहे. पीडित तरूणीने घडलेला सगळा प्रकार आईला सांगितला. त्यामुळे हे प्रकरण उजेडात आले. या प्रकरणी पोलिसांनी ४८ वर्षीय आरोपीला अटक केली आहे.



पालघर जिल्ह्यातील एका गावात तरूणीवर ४८ वर्षीय व्यक्तीने बलात्कार केला. गेल्या ५ महिन्यांपासून आरोपी तिच्यावर अत्याचार करत असल्याचे समोर आले आहे. पीडिता ही गतिमंद असल्याची माहिती मिळते. तिने हा सगळा प्रकार आपल्या आईला सांगितल्याने ही घटना उघडकीस आली. शनिवारी संशयित आरोपीला पोलिसांनी अटक केली आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, विक्रमगडमध्ये ही घटना घडली. पीडिता ही गतिमंद आहे. तिच्याच गावातील आरोपी हा मागील ५ महिन्यांपासून तिच्यावर अत्याचार करत होता. आरोपीला अटक केली आहे. पोलिसांनी सांगितले की, पीडिता गरोदर राहिल्यानंतर तिने याबाबत आपल्या आईला सांगितले. त्यानंतर हा धक्कादायक प्रकार उघडकीस आला. आरोपी हा पीडितेला धमकी द्यायचा. त्यानंतर तिच्यावर अत्याचार करायचा, अशी माहितीही मनोर पोलिसांनी दिली. दरम्यान, पीडितेच्या तक्रारीवरून आरोपीविरोधात बलात्कार आणि इतर संबंधित कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे, अशी माहिती पोलिसांनी दिली.

## 'डीजे' लावून नृत्याचं आमिष, घरात बोलावून 5 वर्षीय चिमुकलीवर अत्याचार



रवी राऊत/यवतमाळ : घरी डीजे लावून डान्स करु असं आमिष दाखवून पाच वर्षीय चिमुकलीवर एका नराधमाने अत्याचार केल्याची संतापजनक घटना उघडकीस आली. मारेगाव तालुक्यातील एका गावात घडलेल्या या घटनेने संपूर्ण मारेगाव तालुका हादरला आहे. याप्रकरणी मारेगाव पोलिसांनी संध्याकाळी आरोपी नराधमाच्या मुसक्या आवळल्या आहे. त्याच्यावर आयपीसी, पोस्को, ॲट्रोसिटीसह विविध कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

आरोपी नीलेश राजू टोंगे (२८) रा. किन्हाळा ता. मारेगाव असं अत्याचार करणाऱ्या नराधमाचं नाव आहे. पीडिता ही तालुक्यातील एका गावात तिच्या आई वडिलांसह राहते. तिचे पालक मजुरी करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. गुरुवार, १० फेब्रुवारी रोजी सकाळी चिमुकलीचे पालक कामासाठी घरुन निघाले. संध्याकाळी ५ वाजताच्या सुमारास चिमुकली ही तिच्या एका मैत्रिणीसह खेळत होती. त्यावेळी पीडिता आरोपी नीलेश टोंगे याच्या घराजवळ गेली. त्यावेळी नीलेशने घरात डीजे लावून डान्स करु, असे सांगून चिमुकलीला घरात बोलावले. त्याच्या आमिषाला बळी पडून चिमुकली आरोपीच्या घरी आल्यानंतर तिच्यावर अत्याचार केला. घरी परत आल्यावर चिमुकलीला त्रास होऊ लागल्याने तिने आईला संपूर्ण घटना सांगितली.

चिमुकलीच्या आईने लगेच ही माहिती चिमुकलीच्या वडिलांना सांगितली. घडलेला प्रकार ऐकून पीडितेचे वडिल घाबरून गेले. त्यांनी याबाबत विचारणा केली असता एक मध्यस्थी माणूस प्रकरण रफादफा करण्याच्या मागे लागला. तर चिमुकलीला त्रास वाढत असल्याने तिच्यावर खासगी रुग्णालयात उपचार करण्याचे ठरले. दरम्यान प्रकरण दडपण्याचा प्रयत्न फसला. शनिवार, १२ फेब्रुवारी म्हणजे घटनेच्या दोन दिवसानंतर दुपारी चिमुकलीला वणीतील एका खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. मात्र डॉक्टरांना हा गंभीर प्रकार तत्काळ लक्षात आला. त्यांनी चिमुकलीला वणीतील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यास सांगितले

पीडितेला ग्रामीण रुग्णालयात नेल्यावर हे संपूर्ण प्रकरण समोर आले. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन उपविभागीय पोलीस अधिकारी संजय पुज्जलवार हे रुग्णालयात पोहचले. आई वडिलांकडून माहिती घेतल्यावर खरा प्रकार त्यांच्या लक्षात आला त्यांनी तात्काळ या घटनेची माहिती मालेरेव ठाणेदारांना देत नाराधम निलेश टोंगे याला ताब्यात घेण्यास सांगितले. त्यानंतर पालकांकडून रीतसर तक्रार घेत मारेगाव पोलिसांनी आरोपी निलेश टोंगे याच्यावर विविध भादंवी ३७६(अ),(ब) बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायदा अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्याच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला तसेच नराधम निलेशला अटक केली.

## अल्पवयीन मुलांनी केला मजुराचा खून; जादुटोण्याच्या संशयातून हत्या

यवतमाळः जादुटोण्याच्या संशयातून गंवडी काम करणाऱ्या मजुराचा निर्घुण खून करण्यात आला. ही घटना शुक्रवारी रात्री वाघाडी येथील होमगार्ड कार्यालयासमोर घडली. तिन्ही मारेकऱ्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले. यामध्ये दोन अल्पवयीन मुलांचा समावेश आहे. लक्ष्मण मसू जाधव (५५) असे मृताचे तर अभय सुदाम नैताम रा. वाघाडी व अन्य दोन अल्पवयीन अशी मारेकऱ्यांची नावे आहे.



याबाबतची फिर्याद युवराज लक्ष्मण जाधव (३५) रा. वाघाडी पावर हाऊसच्या मागे आर्णी रोड, यवतमाळ यांनी अवधूतवाडी पोलीस स्टेशनला दिली. मारेकरी तिघेही एकमेकांचे मित्र आहे. महिनाभरापूर्वी एका अल्पवयीन मुलाने फिर्यादीला वाघाडी येथे रस्त्यावर पाहून तुझा बाप जादूटोणा करतो, तुझ्या वडिलाला चाकूने मारून संपवल्याशिवाय राहणार नाही, अशी धमकी दिली होती. त्यामुळे फिर्यादीने वडिलांना कामावरून रोज घरी पावर स्टेशन समोरून न येता होमगार्ड कार्यालयाकडून येण्यास सांगितले होते. ११ फेब्रुवारीला मृतक नेहमीप्रमाणे सकाळी कामावर गेले होते. फिर्यादीही कामावर गेला. रात्री ८ वाजताच्या सुमारास फिर्यादीची पत्नी मिना जाधव रडत-रडत सम्राट धाब्यावर आली.

बाबाला होमगार्ड कार्यालयाच्या समोरील मैदानात कोणीतरी चाकूने छातीवर वार करून मारले आहे व ते बेशुद्ध अवस्थेत आहे. लवकर चला असे म्हटले. त्यामुळे फिर्यादी पत्नीसह घटनास्थळी पोहोचला.यावेळी शर्ट रक्ताने माखलेला व छातीवर धारदार शस्त्राने मारल्याचे दिसून आले. मृतदेहापासून थोड्या अंतरावर चप्पल व मोबाइल पडून होता. तसेच सायकल खाली पडून होती. मृतदेहाजवळ लहान-मोठे दोन ते तीन दगड पडून होते. घटनेची माहिती मिळताच अवधूतवाडी पोलीस घटनास्थळी दाखल झाले.पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी रुग्णालयात पाठविला. याप्रकरणी खुनाचा गुन्हा नोंद करण्यात आला असून, मारेकऱ्यांना ताब्यात घेण्यात आले. यापैकी दोघे अल्पवयीन आहेत. अधिक तपास अवधूतवाडी पोलीस करीत आहे.

मृतकाने जादुटोणा केल्यामुळेच घरातील गोविंद शेळके व विनोद शेळके या दोन व्यक्तींचा मृत्यू झाला, असा गैरसमज करून मारेकऱ्यांनी राग मनात धरला होता. त्यातूनच महिनाभरापूर्वी फिर्यादीला तुझ्या वडिलाचा खून करण्याची धमकी दिली होती. त्यानुसार मारेकऱ्याने गवंडी काम करणाऱ्या मजुराची हत्या केली. या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

## मुंबई-पुणे एक्स्प्रेस मार्गावर भररस्त्यात कंटेनरला आगीने वेढले



मेहबुब जमादार, रायगड: मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर रविवारी मध्यरात्री एका कंटेनरला आग लागल्याची दुर्घटना घडली. या आगीत कोणतीही जीवितहानी झालेली नाही. प्राथमिक माहितीनुसार, मुंबईहून पुण्याकडे जाणाऱ्या कंटेनरला माडप गावानजीक अचानक आग लागली. याची माहिती मिळताच पोलीस आणि I R B च्या कर्मचाऱ्यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. कंटेनरने रस्त्याच्या मध्येच पेट घेतल्याने वाहतुकीचा खोळंबा झाला होता. त्यामुळे सुरुवातीला कंटेनर बाजूला सारून वाहतूक सुरळीत करण्यात आली. त्यानंतर कंटेनरला लागलेली आग विझवण्यात आली. कंटेनरमधील वस्तुंनी पेट घेतल्यामुळे कंटेनरला आग लागल्याचे समजते. दरम्यान या कंटेनरला लागलेल्या आगीवर नियंत्रण आणल्यानंतर सदर कंटेनर खालापुर टोलनाक्याजवळ आणल्यानंतर धुमसत असलेल्या आगीने पुन्हा पेट घेतला.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. 4, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. 2, गोरेगांव ( पूर्व ), मुंबई - 400 063 येथे छापून 2, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर ( पूर्व ), ठाणे - 401 105 येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. ( सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत ).संपर्कः-9594418181 / 8424989898